www.dainikhindusthan.com
हिंदुस्थान

सराफा बाजार — सोने १० ग्रॅम ६६,२६०.०० चांदी किलो ७६,१००.००

मुद्रा बाजार — अमेरिकन डॉलर ८२.७८ रुपये

शेअर बाजार — बीएसई ७३,६६७.९६ निफ्टी २२,३३५.७०

निवडणूकीच्या तोंडावर सौहार्दाला नख लावण्याचा प्रकार

वंचित प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची पत्रपरिषद

अमरावती,दि.१२ : आगामी लोकसभा निवडणूकीच्या तोंडावर सामाजिक सौहार्दाला नख लावण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. स्थानीक शासकीय विश्रामगृह येथे पत्रकारांशी त्यांनी आज मंगळवारी त्यांनी संवाद साधला.

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील पांढरी (खानामपूर) गावातील प्रवेशद्वाराच्या मुद्यावरून सोमवारी दगडफेक व हिंसेच्या घटेनंतर आज मंगळवारी वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर अमरावती येथे पोहोचले. त्यांनी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांची भेट घेवून चर्चा केली. स्थानीक विश्रामगृह येथे पत्रकारांशी देखील त्यांनी संवाद साधला. पांढरी खानमपुर प्रकरणातील हिंसा निंदनीय असल्याचे ते म्हणाले. आगामी लोकसभा निवडणुका बघून वातावरण तापविण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे या घटनेचा मुख्य सूत्रधार शोधून त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे करण्यात आली आहे असे त्यांनी सांगितले.

पांढरी येथील प्रवेशद्वार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने बांधण्यात येणार आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून बांधकाम होईल, असे प्रशासनाचे ठरले होते. त्याची प्रक्रियाही अंतिम टप्प्यात होती. या विषयावर पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनीही सहमती दर्शवली होती. मात्र डीपीसीतून प्रवेशद्वारासाठी निधी कोणत्या स्रोतातून द्यायचा, याचा विचार सुरू होता. ही माहिती ग्रामस्थांना देण्यात आली. मात्र त्यापूर्वीच घडलेला प्रकार दुःखद आहे. या घटनेचा तपास करतांना अहवाल तयार झाल्यानंतरच सर्वांवर गुन्हे दाखल करावेत असे ते म्हणाले. याबाबत पोलीस *(उर्वरित पान २ वर)*

संजय राऊत खोट बोलत आहे

ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी पत्रपरिषदेत शिवसेना प्रवक्ता संजय राऊत राऊत यांच्यावर निशाना साधला. ते खोटे ब्रिफींग करीत आहेत. वंचित आमच्याकडे जागा मागत नसल्याचे ते म्हणत आहेत. प्रत्यक्षात यांच्यातील वाद सुटल्यानंतर आम्ही जागा मागणार आहोत. म्हणून तुम्ही तुमचे मिटवा व मग आम्ही बोलणार आहोत असे ते म्हणाले. काँग्रेसचे प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथल यांच्याशी संपर्काचा प्रयत्न केला आहे. याशिवाय राष्ट्रीय अध्यक्ष मल्लीकार्जुन खरगे यांना आपल्या स्वाक्षरीचे पत्र दिले आहे. काँग्रेसने महाविकास आघाडीकडे मागितलेल्या जागा व वंचितच्या जागांबाबत चर्चा करण्याचे आवाहन केले. परंतु अद्याप काँग्रेस कार्यालयातून यास दुजोरा मिळाला नाही. यांच्या चर्चा लवकर संपणार असल्याची अपेक्षा त्यांनी वर्तविली.

दहा जागेचा तिढा

आगामी लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीसोबत सध्या दहा जागांचा तिढा कायम आहे. या जागा काँग्रेस व शिवसेना मागत आहे. अन्य पाच जागा शिवसेना (उबाठा), काँग्रेस व शरद पवार गट वाटाघाटी होत नाही. पाचही जागा मागत आहेत. एकही जण जागा सोडत नाही. त्यांचा समझौता होत नाही.

पांढरी खानमपुर हिंसा प्रकरणात पंधराशे जणांवर गुन्हे

दोघांना अटक, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी

अमरावती,दि.१२ : पांढरी खानमपुर येथील प्रवेशद्वारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याच्या कारणावरून सोमवारी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर झालेल्या दगडफेक व हिंसा प्रकरणात पोलीसांनी एक हजारापेक्षा अधिकांवर गुन्हे दाखल केले आहेत. याप्रकरणात आतापर्यंत दोघांना अटक करण्यात आली आहे. सीसीटीव्हीतील फुटेजच्या माध्यमातून पोलीस आरोपींचा शोध घेत आहे. पसार आंदोलकांची धरपकड सुरु आहे. दरम्यान, अमरावती सह अंजनगाव सुर्जी तालुक्यात शांतता असून पोलीसांचा चोख बंदोबस्त नेमण्यात आला आहे.

पांढरी खानमपुर येथील प्रवेशद्वाराचा मुद्यावरून गत महिनाभरापासून आंदोलन सुरु आहे. सदर मागणीसाठी गुरुवारी गावातील आंबेडकरवादी विभागीय आयुक्तालयावर धडकले होते. सलग पाच दिवस ठिय्या दिल्यानंतर त्यांचा संयम सुटला. विभागीय आयुक्तालयात आयुक्त निधी पांडे, जिल्हाधिकारी सौरभ कटीयार व पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांच्या बैठकीनंतर सदर विषयाबाबत ग्रामसभेत निर्णय घेण्यात यावा, असे सूचविले गेले. मात्र प्रशासनाचा हा तोडगा मान्य न झाल्याने आंदोलकांपैकी काहींनी पोलीसांवर दगडफेक केली होती. पोलीसांच्या गाड्यांची नासधूस होवून अनेक पोलीस कर्मचारी जखमी झाले. दगडफेकीमुळे पोलीसांनी लाठीमार, पाण्याचा मारा व अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या होत्या.

पोलिस उपनिरीक्षक गजानन प्रताप लोकडे यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात नोंदविली आहे. १००० ते १५०० अज्ञात पुरुष व महीलांविरुध्द बेकायदेशिर जमाव जमविणे, शासकीय कामात अडथळा करणे, पोलिस अधिकारी व अंमलदारांवर हल्ला करणे, इच्छापूर्वक दुखापत करणे तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, अशा भादंविच्या कलम १४३, १४७, १४८, १४९, १०९, ११७, ३५३, ३३२, ३३३, ४२७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्ता हानी प्रतिबंधक अधिनियम १९८४ सहकलम १३५ महाराष्ट्र पोलिस कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीसांनी सुनील रायबोले व पाडुरंग राक्षसकर या दोघांना अटक केली आहे. दरम्यान, याप्रकरणात व्हीडीओ शुटींग, सीसीटीव्हींची तपासणी करून करण्यात येत असून आरोपींचा शोध घेत जात आहे. आरोपींची धरपकड सुरु आहे. सद्यास शहरात शांतता आहे. नागरिकांनीही कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नये असे आवाहन पोलीसांच्या वतीने करण्यात आले आहे. *(उर्वरित पान २ वर)*

वाढदिवस शुभेच्छा!!

झुबीन दोतीवाला
मो. ९४२२६५१९११
विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवनचे विश्वस्त
झुबीन दोतीवाला यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा

गोळीबार प्रकरणाचा युद्धपातळीवर तपास

संशयाची सुई वळली उत्तरप्रदेशाकडे पथके रवाना

अमरावती, दि.१२ : शेगांव येथून नागपुरकडे जाणाऱ्या ट्रॅव्हलर वाहनावर गोळीबार करण्यात आल्याच्या घटनेप्रकरणात पोलीस युद्धपातळीवर तपास करीत आहेत. संशयाची सुई उत्तरप्रदेशातील आरोपींकडे वळली आहे. आरोपींच्या शोधार्थ पोलीसांची पथके रवाना करण्यात आली आहे. दरम्यान, याच दिवशी रात्री एका डंम्पर चालक व वाहकास लुटण्यात आले होते. पळविण्यात आलेला हा डंम्पर मध्यप्रदेशात आढळून आला आहे.

नागपुरच्या मानेवाडा येथील १७ भाविक शेगांव येथे दर्शनासाठी गेले होते. रविवारी रात्री ते नागपुर येथे परत जात असतांना नांदगाव पेठ हद्दीत त्यांच्या ट्रॅव्हलर या वाहनावर गोळीबार करण्यात आला होता. एका वाहनाने त्याचा पाठलाग केल होता. यातीलच हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. यात ट्रॅव्हलर वाहन चालकाच्या बाजूला असलेल्या काचा तुटल्या होत्या. एक गोळी ही वाहन चालक खोमदेव केवळ कवळे (३९, झिंगा *(उर्वरित पान २ वर)*

पांढरी घटनेची सीआयडी चौकशी करा

रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकरांची मागणी, जखमींची घेतली भेट

अमरावती,दि.१२ : अंजनगांव सुर्जी तालुक्यातील पांढरी खानमपुर येथील प्रवेशद्वारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याच्या कारणावरून सोमवारी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर झालेल्या दगडफेक व हिंसा झाली. या घटनेनंतर आज अमरावती येथे पोहोचलेले रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर यांनी सदर प्रकरणाची सीआयडी चौकशीची मागणी केली आहे.

पांढरी खानमपुर येथील प्रवेशद्वाराच्या मुद्यावरून आंबेडकरवादी नागरिकांनी गत गुरुवारपासून विभागीय आयुक्त कार्यालयासमोर ठिय्या दिला होता. परंतु सोमवारी त्यांच्या संयमाचा बांध तुटल्यानंतर दगडफेकीची घटना घडली होती. पोलीसांनी लाठीमार, पाण्याचा मारा व अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडल्या होत्या. हिंसा प्रकरणात पोलीसांनी सुमारे १५०० जणांवर गुन्हे *(पान २ वर)*

रचनाच्या रचनात्मक चित्रांची नेचर एक्स ट्रॅक्ट प्रदर्शनीद्वारे भुरड

नोकरी सोडून कॅन्व्हसवर रेखाटले स्वत:चे भावविश्व १५ ते १७ मार्च दरम्यान अमरावतीमध्ये चित्र प्रदर्शनी

अमरावती दि.१२ : उच्च शिक्षण घेतल्या नंतर मोठ्या पगाराची नोकरी आणि सुखी आयुष्य बस्स... एवढच ध्येय बहूतांश प्रत्येकाचे असते. मात्र ज्यांना आयुष्य जगायचं असते त्यांच्यासाठी नोकरी, पैसा गौण असतो. रचना बजाज अमरावतीच्या सुकन्या. बीई (संगणक) आणि आयटी क्षेत्रात मोठ्या पदावर मोठ्या पगाराची नोकरी मात्र, अंतरंगात असलेलं भावविश्व त्यांना कलेच्या वोटवर खेचत होते. नेमकं काय करावं यावर खुपकाही कथ्याकूट न करता मनाला जे पटलं, जे अंतरंगात होते त्याचा स्विकार करीत रचना यांनी आपल्या रचनात्मक भावविश्वाला कॅन्व्हसवर रेखाटले. त्यांनी साकारलेल्या निसर्गाच्या विविधतेची मनमोहक कलाकुसर नेचर एक्स ट्रॅक प्रदर्शनीमध्ये कलारसिकांना भुरड पाडत आहे. येत्या १५ ते १७ मार्च दरम्यान राजापेठ पोलीस स्टेशन जवळ असलेल्या जे.के टॉवर येथील पीएनजी आर्ट गॅलरी येथे नेचर एक्स ट्रॅक्ट प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले असून रचना बजाज यांच्या रचनात्मक *(उर्वरित पान २ वर)*